# 'पीएनजी'च्या अमेरिकेतील शाखेला 'ए' मानांकन

ACCREDITED BUSINESS
BBB
Start With Trust
PNG Jewelers, Inc.
sanjose.bbb.org

पुण्यातील प्रसिद्ध सराफी पेढी पु. ना. गाडगीळ आणि कंपनी (पीएनजी) यांच्या अमेरिकेतील शाखेला अमेरिकेच्या बेटर बिझनेस ब्यूरोचे (बीबीबी) 'ए' मानांकन मिळाले आहे. बीबीबीचे 'ए' मानांकन मिळविणारी पीएनजी ही पहिली भारतीय सराफी कंपनी आहे. पीएनजीची व्यवसायाशी असलेली बांधीलकी, जबाबदारीची जाणीव, समग्रता, गुणवत्ता आणि व्यवहारातील पारदर्शकता यांच्यामुळे हे मानांकन मिळाले आहे. 'पीएनजी'ची अमेरिकेतील शाखा तेथील ग्राहकांचा व्यवसाय जिंकण्यात यशस्वी झाली असून बेटर ब्युरोचे मिळालेले मानांकन हे त्याचेच प्रतीक आहे, असे पीएनजी आयएनसीचे अध्यक्ष सौरभ गाडगीळ यांनी सांगितले.